
प्रसिद्ध वक्ते
व
शिक्षणमहर्षी
डॉ. लीला पाटील
परी
प्रकाशन

**प्रसिद्ध वक्ते व**
**शिक्षणमहर्षी**

◆ ————————

© लेखकाधीन

◆ ————————

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ————————

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ————————

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆ ————————

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ————————

**किंमत :**
रुपये १२०/-

**प्रसिद्ध वक्ते ........................................ ३**

१. शिवाजीराव भोसले ........................................ ५
२. दादा धर्माधिकारी ........................................ २१
३. नरहर कुरुंदकर ........................................ ३७
४. आचार्य अत्रे ........................................ ५३
५. राम शेवाळकर ........................................ ६९

**शिक्षणमहर्षी ........................................ ८५**

१. जे. पी. नाईक ........................................ ८७
२. डॉ.पंजाबराव देशमुख ........................................ १०२
३. महर्षि धोंडो केशव कर्वे ........................................ ११७
४. डॉ. बापूजी साळुंखे ........................................ १३२
५. कर्मवीर भाऊराव पाटील ........................................ १४७

# प्रसिद्ध वक्ते



# शिवाजीराव भोसले

शिवाजीराव भोसले एक तत्वचिंतक, आत्मचिंतन करणारे प्राध्यापक, योगमय जीवन जगणारे एक साधक आणि उभ्या महाराष्ट्राला प्रबोधनाचा प्रकाश दाखविणारे एक लोकशिक्षक व समाजमनाचं स्वत:च्या ओघावत्या वाणीनं संस्करण करणारा वक्ता. शिवाजीरावांचा जन्म हा सातारा जिल्ह्याच्या पूर्वेस असलेल्या कलेढोण गावचा. त्यांचा जन्मदिवस १५ जुलै १९२७ सालचा आहे. शिवाजीरावांचे वडील अनंतराव तथा अण्णासाहेब भोसले हे थर्ड इयर ट्रेंड प्राथमिक शिक्षक होते. शिवाजीरावांच्या मातु:श्री अनुसयाबाई या कमी शिकलेल्या असल्या तरी तत्वनिष्ठ होत्या. शिवाजीरावांच्या गंगौघासारख्या वक्तृत्वाचे उगमस्थान त्यांचे वडील अनंतराव हेच होते. खूप अभ्यासाने आणि प्रचंड वाचनाने ही कला प्रगल्भ झाली असली तरी तिचे बाळकडू त्यांच्या वडिलांच्या ठाकुरकीच्या व मर्दानी बाण्याच्या बोलण्यातून मिळाले.

शिवाजीरावांच्या वडिलांच्या साधी राहणी, बाणेदार वृत्ती आणि स्वतंत्र विचारसरणी यांचा संस्कार त्यांच्या पाच मुलं व एक मुलगी यांच्यावर नकळत घडत गेला. मुलांचे वडील हेच त्यांचे आदर्श होते. त्यांचे चरित्र निर्विवाद अशा स्वरूपाचे होते. त्यामुळे आर्थिक परिस्थिती बेताची असली तरी गरीब समाजात त्यांना एक प्रकारची मान्यता होती. ते शिक्षक होते. फुले, आंबेडकर आणि शाहू छत्रपती यांच्या विचाराने ते भारलेले होते. त्यांच्या सामाजिक जाणिवा प्रगल्भ होत्या. बहुजन समाजाच्या उन्नतीचा ध्यास त्यांना लागलेला होता. ते संस्कार मुलांवर झाले.

शिवाजीरावांनी एक दोन वर्षं कलेढोण येथे शिक्षण घेतल्यानंतर त्यांचा शालेय शिक्षणाचा पूर्वार्ध विटा या गावी तर उत्तरार्ध साताऱ्यात झाला. महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रारंभ कोल्हापुरात झाला, तर समाप्ती पुण्यात झाली. ज्ञान ही एकमेव इस्टेट मानणारे वडील, कुटुंब मोठं व आर्थिक स्थिती बेताची. त्यामुळे मुलांना पुढील शिक्षणासाठी सातऱ्यात ठेवणं तेही खोली घेऊन हे परवडण्यासारखे नव्हते त्या प्राथमिक शिक्षकाला; पण मुलांनी मोठं व्हावं व खूप शिक्षण घ्यावं ही तीव्र इच्छा. तेव्हा शिवाजीरावांना सातारा येथे शिवाजी वसतिगृहात पाठवण्यात आलं.

ते बोर्डींग म्हणजे झोपड्यांचे. मुलांना झोपडी उभी करण्यासाठी सर्व सामग्री देण्यात यायची. मुले स्वत: झोपड्या उभ्या करायची. स्वावलंबनाचे धडे शिवाजीरावांना बोर्डिंगमध्ये मिळाले. विद्यार्थ्यांकडून गट पाडून स्वयंपाक करून घेतला जात असे. पीठ मळणं, भाकरी थापणं, भाजणं, आमटी बनवणं वगैरे सर्व प्रकार होते. शिवाजीरावांना ते सगळं करावं लागलं. चैन करणं ही कल्पना अस्तित्वात नव्हती. जवळ पैसाही नव्हता. हॉटेल्स असली तरी तिथं जावं अशी भावना होत नव्हती. स्वत: झोपडी बनवून राहण्यापासून ते सर्व दैनंदिन कामं स्वत:च करायची. अशा वातावरणात शिवाजीराव अंतर्मुख होऊन विचार करीत. ते मित्रांपेक्षा निसर्गात रमत. डोंगरावर जाणं, चढउतार करणं, ते करीत असताना मनात काहीतरी विचार, चिंतन करणं हे सगळं सुरू होतं. विचार आणि चिंतन हेच त्यांचे मित्र होते.

शिवाजीराव कसल्याही शिष्यवृत्त्या, पारितोषिके न मिळवता पण कोणत्याही वर्गात मुक्काम न करणारे ते विद्यार्थी. तसे परीक्षेच्या आखाड्यात चमकले नाही तरी त्यांची ज्ञानसाधना मात्र मूकपणे सुरू झाली होती. १९४२ चा काळ. अधूनमधून शाळा बंद असायच्या. तेव्हा वेळ घालवण्यासाठी शिवाजीराव शेजारी असणाऱ्या नगर वाचनमंदिरात जात असत. समज बेताची असली तरी वाचनाची आवड होती. वाचनालयातून पुस्तके घरी न्यायची झाल्यास दरमहा चार आणे वर्गणी असा नियम. तेवढे पैसे देणेही त्याकाळी त्यांना न परवडण्यासारखे; परंतु त्यांनी खूप विचार केला व चार आण्याची व्यवस्था केली. ती दोन रुपये उसने आणून म्हणजे मागून आणून आणि ग्रंथ घरी न्यायला प्रारंभ केला.

ग्रंथपालाने 'राजयोग' हे पुस्तक शिवाजीरावांना दिले. त्याचे लेखक स्वामी विवेकानंद. पुस्तक चाळायला सुरुवात केली. त्यातले यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी हे शब्द त्यांना भयावह वाटत होते. त्यांनी ते पुस्तक ग्रंथालयात परत करायला नेले. तेव्हा ग्रंथपालाने ते पुन्हा एकदा वाचण्याचा सल्ला दिला. शिवाजीरावांनी ते पुस्तक पुन्हा वाचलं. विवेकानंद या लेखकाला, व्यक्तिमत्वाला,काही आशयाला प्रवेश मिळाला आणि तो भाग तसाच तिथं स्थिरावला. कालांतराने तो अंतर्यामी रुजला.

कोल्हापुरात राजाराम कॉलेजमध्ये सायन्स शाखेत प्रवेश घेतला. तेव्हा ना. सी. फडके मानसशास्त्र, तर्कशास्त्र आणि तत्वज्ञान हे विषय शिकवत. ते कला शाखेचे विषय. शिवाजीराव शास्त्र शाखेचे विद्यार्थी पण त्यांना त्याची आवड नव्हती व त्या विषयात गती नव्हती. म्हणून शिवाजीराव ना. सी. फडकेंच्या तासाला बसण्याची परवानगी विचारायला त्यांच्याकडे गेले,

तेव्हा ना. सी. फडके म्हणाले, ''मी आता हे गाव लवकरच सोडणार आहे. पुण्याला जाणार आहे तेव्हा तू पुण्याला का जात नाहीस ? वाडिया कॉलेजला प्रवेश देण्यासाठी मी सांगू शकेन.''

शिवाजीरावांना पुण्याचा रस्ता दाखविला तो ना. सी. फडके सरांनी. ते पुण्याला आले. पेहराव तोच. एक पायजमा, त्यावर साधाच शर्ट व डोक्यावर कापडी टोपी. कपड्याचे दोन सेट. एक धुवायचा दुसरा घालायचा. भाड्याची खोली आणि स्वावलंबी जगणं. सायकल तेवढी सोबत. फर्ग्युसनला प्रवेश व एस. पी. कॉलेजचे तास होत असत. दोन्ही कॉलेजमध्ये तासाला बसायचे. ज्ञानाच्या कक्षा

रुंदावत होत्या. शिवाजीरावांना वाचनाचा छंद आणि त्याकाळचे मोजके व दर्जेदार साहित्य त्यांनी अक्षरश: हावरटासारखे वाचले. पाठांतरही तितकेच कमालीचे. ध्यास एकच वाचनाचा.

वक्तृत्वाचा तो सुवर्णकाळ होता. अलौकिक वक्तृत्वाने प्रभावित करणारे अनेक वक्ते पुण्यात येत. जे. कृष्णमूर्तींची जवळपास वीस–बावीस व्याख्याने त्यांनी ऐकली. शिवाजीराव व्याख्यानमालांची व्याख्याने चुकवत नसत. ना. सी. फडके, आचार्य जावडेकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, माटे वगैरेंची भाषणे कानात प्राण व मनात श्रद्धा ठेवून त्यांनी ऐकली.

पदवीनंतर पुढे काय ? तर वकील व्हावे अशी घरच्या मंडळींची इच्छा होती. तसा त्यांनी प्रवेश घेतला कायद्याच्या कोर्सला. मात्र साहित्य, तत्वज्ञान, समाजकारण, अध्यात्म या विषयात रस घेणारे व असणारे शिवाजीराव; पण त्याची भूक भागवतच त्यांनी कायद्याची पदवी घेतली. लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्याने त्यांच्या मनाची पकड घेतली. खरे तर वकिलीचा त्यांचा पिंड नव्हता. अशिलाला आपण मनासारखा निकाल मिळवून देऊ शकतो पण न्याय देता येतोच असे नाही हे त्यांना सतत जाणवू लागले. पैशासाठी प्रत्येक क्षणी आत्मवंचना करणार तरी किती दिवस?

१९५७ साली महाराष्ट्रात पहिले ग्रामीण महाविद्यालय फलटण येथे कै. मालोजीराव निंबाळकर यांनी सुरू केले. तर्कशास्त्र शिकवण्यासाठी प्राध्यापक हवा अशी जाहिरात देण्यात आली होती. शिवाजीरावांनी अर्ज केला. मुलाखत झाली.

महाविद्यालयाच्या नोकरीसाठी कर्मवीर भाऊराव पाटील शिवाजीरावांना घेऊन मालोजीरावांकडे गेले आणि म्हणाले, ''श्रीमंत, माझ्या ज्ञानरूपी वटवृक्षाची एक फांदी मी बरोबर आणली असून ती तुम्हाला देत आहे. तुम्ही ही ठेवून घ्या. या फांदीपासून एक वृक्ष तुमच्याकडे निर्माण होईल.'' कर्मवीरांचे शब्द खरे ठरणार हे श्रीमंतांना जाणवले आणि तेव्हापासून भोसले फलटणकर झाले.

फलटणचे वातावरण शांत. शिवाजीराव पहाटे चारला उठत. दोन – अडीच तास अध्ययन करायचं. पुन्हा कॉलेजात जायचं. अध्यापन करायचे. सायंकाळी फिरायला जाणं, अध्ययन आणि चिंतन सुरू असायचं. तत्त्वज्ञान, मानसशास्त्र व तर्कशास्त्र हे त्यांच्या अध्यापनाचे विषय. कॉलेजच्या सोयीसाठी इंग्लिशही शिकवणे भाग पडले. परिणाम असा झाला की भोसले सर सर्व विद्यार्थ्यांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू बनले. प्रसन्न व्यक्तिमत्व, मधुर भाषा, कंटाळा घालवणारे विनोद, जिव्हाळा उत्पन्न व्हावी अशी शैली, गरजू विद्यार्थ्यांबद्दल एका प्रकारची कणव त्यामुळे सरांचे तास ही विद्यार्थ्यांना पर्वणीच वाटत होती.

शिवाजीराव आता स्थिरावले. आवडते मनासारखे जीवन जगता येऊ लागले. त्यातच प्रांताधिकारी श्री. आर. वाय. सावंत यांच्या सुकन्या सुशीलाताई यांच्याशी त्यांचा विवाह ठरला. सुशीलाताई सर रूईया कॉलेजच्या विद्यार्थिनी आणि गिरिजा कीर यांच्या समकालीन. लग्न ठरले पण साताऱ्यात काही केल्या मंगल कार्यालय मिळेना. कर्मवीर भाऊराव पाटील यांना ही अडचण समजली. तेव्हा शिवाजीरावांचे बंधू बाबासाहेब (पुढे माजी मुख्यमंत्री महाराष्ट्राचे) यांना बोलवून

सांगितले की 'आपलं शाहू बोर्डिंग आहे त्याच्या प्रांगणात शिवाजीरावांचा विवाहसोहळा करावा. मांडव घालून देतो. तो सोहळा येथे झाल्यास मला आनंद वाटेल.' १० मे १९५८ रोजी मोठ्या थाटात शिवाजीराव विवाहबद्ध झाले. ज्या प्रांगणात ते शिकले तिथंच आयुष्यातला अत्यंत आनंदाचा सोहळा पार पडला हे केवढं मोठं भाग्य !

शिवाजीरावांचा संसार दोन खोल्यांत, बुरूड गल्लीत दुधाळ वाड्यात भाड्याने. दीडशे अधिक पन्नास असे दोनशे वेतन. सुशीलाताई तर सधन कुटुंबातल्या. प्रांत ऑफिसरच्या कन्या, बंगल्यात राहणाऱ्या; पण एका ध्येयवादी प्राध्यापकाबरोबरचा हा संसार त्यांनी मोठ्या आनंदाने स्वीकारला आणि जिद्दीने केला. कारण शिवाजीरावांकडे विचारांची श्रीमंती जबरदस्त. अशा माणसाबरोबर सुशीलाबाई मोठ्या आनंदानं जीवन घालवू लागल्या.

१९६३ साली प्राचार्य ओक रिटायर्ड झाले आणि अवघ्या सहा वर्षात प्राचार्यपदाची धुरा शिवाजीरावांच्या खांद्यावर आली. कॉलेजच्या प्रमुख पदाची जबाबदारी पार पाडताना काही अडचणी व संकटे निर्माण झाली. विघ्नसंतोषी मंडळींनी शासनाकडे तक्रारी केल्या. कॉलेजची मान्यता काढून घेण्यापर्यंत त्याचा परिणाम झाला; परंतु राजेसाहेब व प्राचार्य यांनी त्रास सहन करीत सर्व सुरळीत करण्यासाठी आटापिटा केला. जनमानसातील गैरसमज दूर करण्यासाठी प्राचार्य शिवाजीराव गावोगावी फिरले; पण विद्यार्थ्यांचा जबरदस्त पाठिंबा प्राचार्यांना होता. गरीब, गरजू विद्यार्थ्यांबद्दल कळवळा, त्यांना आर्थिक सहाय्य करणे, मनमोकळेपणाने संवाद साधणारे प्राचार्य विद्यार्थीप्रियच !

शिवाजीराव भोसले हे वक्ता म्हणून महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर ख्याती मिळवत राहिले. त्यांचे वक्तृत्व हीच त्यांची ख्यातनाम ओळख होय. त्या त्यांच्या 'वक्ता' या व्यक्तिमत्वावरच हे पुस्तक प्रामुख्याने लिहिण्याचा उद्देश असल्याने यापुढील लेखन त्यावर भर देणारे आहे.

फलटण व आसपासच्या भागात शिवाजीरावांना कार्यक्रमाचे निमंत्रण यायचे. खेड्यात शिवजयंती, आंबेडकर जयंती साजरी व्हायची. सकाळचं कॉलेज असल्यामुळे संध्याकाळची निमंत्रणं प्राचार्य स्वीकारायचे. मानधन हा प्रकार नव्हता. त्याकाळी एस्. टी. ही बऱ्याचदा नसायची. संयोजकांपैकी कुणातरी मोटारसायकलवर न्यायला यायचा. व्याख्यानाची वेळ संध्याकाळची. नेणारा माणूस वेळेवर कधीच यायचा नाही. मिरवणूक पार पडल्यावर पाहुण्याची आठवण. प्राचार्य पाठीमागे स्वार व्हायचे. त्या वेळचे रस्ते म्हणजे विचारण्याची सोय नव्हती.रस्त्यावरचे दिवे असतीलच याची खात्री नसायची. अंधाऱ्या रस्त्यावर दोघांनीच प्रवास करताना चोरांचं भय तर असायचं.

कुणाला कार्यक्रमासाठी नाही म्हणणं हा सुरुवातीला प्राचार्यांचा स्वभाव नव्हता. एका दुपारी एका खेडेगावातील मुख्याध्यापक प्राचार्यांकडे आले व शाळेच्या स्नेहसंमेलनाला प्रमुख पाहुणा म्हणून यावे अशी विनंती करू लागले. त्यांचे वय, भर दुपारची उन्हाची वेळ, प्राचार्यांना आग्रह मोडवेना. मुख्याध्यापकांनी दिनांक, वार व वेळ सांगितली.

मुख्याध्यापक म्हणाले, ''आमच्या गावाला एस्. टी. ची सोय नाही. अमुक एका फाट्यावरती उतरा. तिथेच झाडाखाली थांबा. आमचा एक फोटोग्राफर येईल. तो कार्यक्रमाचे फोटो काढण्यासाठी

तिकडेच येणार आहे. तो मोटरसायकलवरून तुम्हाला तिकडे घेऊन येईल.'' त्या निमंत्रणानुसार ठरलेल्या दिवशी प्राचार्य फाट्यावर उतरले. आसपास चिटपाखरू नाही. झाड नव्हते. तिथेच डोक्यावरती रुमाल टाकून एका दगडावर बसून राहिले. वाट पाहात बसले. दोन तासांनी फोटोग्राफर आला. प्राचार्यांना कोटावरून ओळखले. प्राचार्य मोटारसायकलवर मागे स्वार झाले. फोटोग्राफरने एका गावात गाडी वळवली.

प्राचार्यांनी विचारले, ''आपण समारंभाकडेच जात आहोत ना?''

त्यावर तो शांतपणे म्हणाला, ''या गावात चार – दोन फोटो काढायचे आहेत. तेवढं काम झालं की कार्यक्रमाकडे जाऊ.''

ज्या घरी फोटो काढण्यासाठी निमंत्रण होतं तिथली मंडळी आवरून तयार नव्हती. फोटोग्राफर आला आहे हे पाहून मग आवरायला सुरुवात केली. मग फोटोचा कार्यक्रम जरा हसा बघू अशा सूचना. प्राचार्य खजिल झाले होते; पण पर्याय नव्हता. फोटोग्राफरनं चार – दोन गिऱ्हाईकं केली. आता नियोजित कार्यक्रमासाठी ते निघाले. फोटोग्राफरने मुख्याध्यापकाच्या घरी त्यांना सोडले. प्राचार्यांनी त्यांच्या घराची कडी वाजवली. डोळे चोळत मुख्याध्यापकांनी दार उघडले. आश्चर्याने म्हणाले, ''आपण आलात का ? येणार नाहीत असंच मला वाटलं होतं.''

प्राचार्य म्हणाले, ''कार्यक्रम कुठं आहे ? कधी आहे ? तयारी झाली का ?''

त्यावर ते म्हणाले, ''अहो, तयारीचं काय ! आता तयारी होईल.'' प्राचार्यांना घेऊन शाळेच्या प्रांगणात गेले. मग त्यांनी भराभर निरोप पाठवले. मुलं आली. चार बॅरल आणली. शिपाई सज्ज. त्यावर फळ्या टाकल्या, दोर बांधले गेले. व्यासपीठ तयार झाले. मुलांचे चार – दोन कार्यक्रम झाले. प्राचार्यांचा सत्कार झाला. भाषण झाले. कार्यक्रम संपला. संपल्यावर मुख्याध्यापक विचारू लागले, ''आपण घरी जाऊन जेवणार की तुमची व्यवस्था इथं काही करायची ?'' प्राचार्यांनी रागरंग ओळखला. त्यांनी काढता पाय घेतला. फोटोग्राफरने पुन्हा त्यांना कुठल्यातरी फाट्यावर सोडले. तिथून ते कलेढोणला गेले. घरी जाऊन जेवण करून झोपेची आराधना सुरू झाली. वक्तृत्व छंदापायी आपण भोगलेल्या यातनांची ती मालिकाच एक त्यांच्या डोळ्यासमोरून पुढं पुढं सरकत होती; पण आलेल्या प्रसंगाला सामोरं जाण्याची ही हिंमत प्राचार्यांना ग्रामीण भागातील कार्यक्रमांमुळे आली. धडक घेणे, वाट काढणे आणि चालत राहणे ही ती हिंमत या वक्तृत्व छंदामुळे.

फलटणला मुधोजी कॉलेजचे प्राचार्य झाल्यावरही ते सामान्य जीवन जगत. पांढरी पँट, पांढरा शर्ट व त्यावर कोट असा पेहराव. या त्यांच्या पेहरावाची पाहणाऱ्यांना सवय आणि हाच पेहराव व्याख्यानासाठी ही आचार्यांची धारणा झाली होती. तीच नेहमी राहिली. एका व्याख्यानाचा आनंद मिळवण्यासाठी अडथळे पार करावे लागत असत; पण पुढे प्राचार्यांना जी एक लोकमान्यता लाभली, सर वक्तृत्वाच्या क्षेत्रातले मानदंड ठरले त्या भव्य इमारतीची पायाभरणी मात्र त्यांनी मोठ्या कष्टाने केली आहे. लाभलेली प्रसिद्धी, मिळालेलं मोठेपण हे सहजासहजी एका रात्रीत प्राप्त झालेलं नाही. त्यासाठी फार मोठी किंमत वेचलेली आहे. त्रास सहन केलेला आहे. पेंगुळलेली बायको व थकलेली

अंजू आणि संजू ही दोन मुलं घेऊनही व्याख्यानाहून परतीचा प्रवास करण्याच्या यातना सोसल्या. एखादी भव्य आणि दिव्य कलाकृती जेव्हा आपण पाहतो तेव्हा तिचं भव्यत्व, दिव्यत्व पाहताना आपण दिपून जातो, आश्चर्यमुग्ध होतो; पण ती घडत असताना सोसलेल्या यातनांचा, घेतलेल्या कष्टांचा विसर पडण्याची फार मोठी शक्यता असते. स्वत:चं वक्तृत्व सिद्ध करण्यासाठी प्राचार्यांनी असे टाकीचे घाव सोसलेले आहेत.

प्राचार्यांना आपल्याही महाविद्यालयात मोठे व्याख्याते यावेत, त्यांचं वक्तृत्व, त्यांचे विचार विद्यार्थ्यांना ऐकायला मिळावे ही त्यांची इच्छा. केसरीचे तेव्हाचे संपादक जयंतराव टिळक प्रमुख पाहुणे होते. त्यावेळी हजरजबाबीपणाने शब्दांवर कोट्या करण्यात प्राचार्यांचा हातखंडा होता. तेव्हा जयंतरावांची 'स्वमतपंडित करून परमत खंडित करणारे विख्यात पत्रपंडित' अशी प्राचार्यांनी ओळख करून दिली. स्वत: जयंतरावांनी मला तुमच्या प्राचार्यांसारखी पल्लेदार वाक्ये बनवून बोलता येत नाहीत असे प्रांजळपणे कबूल केले. खरे तरी कॉलेजच्या स्नेहसंमेलनाच्या प्रमुख समारंभाच्या वेळी पाहुण्यांची ओळख करून देणारी त्यांची प्रास्ताविक भाषणं प्रमुख पाहुण्यांना सुद्धा मंत्रमुग्ध करून टाकीत.

शिवाजीरावांच्या वक्तृत्वाला खरा बहर आला तो १९६३ साली. विवेकानंद हे प्राचार्यांच्या विचार यात्रेमधलं पहिलं स्थानक आहे. पहिलं तीर्थक्षेत्र आहे. विवेकानंद हा प्रथमपासून त्यांच्या आकर्षणाचा विषय होता. १९६३ साली विवेकानंदांची जन्मशताब्दी होती. शासनमान्य अशी एक समिती त्यासाठी कार्यरत झाली होती. तिला निष्ठावान असे कार्यकर्ते हवे होते. त्यासाठी प्राचार्यांचे नाव सुचवले गेले. पुणे, सातारा, उंब्रज, कराड, पाटण, सांगली, कोल्हापूर, नगर, परभणी, नाशिक यासारख्या जवळच्या व दूरच्या गावी रोजच त्यांची व्याख्याने झाली. ती लोकप्रिय ठरली. त्यांच्या सांगली येथील भाषणाच्या पाच हजार प्रती त्या साली समितीकडून वाटल्या गेल्या.

एका ध्वनिपातळीवर, विशिष्ट लयीत, कोठेही न थांबता, चुकूनही न अडखळता, अत्यंत जलद गतीने बराच काळ बोलत राहणारा हा वक्ता सर्वांच्या कौतुकाचा आणि आश्चर्याचा भाग बनला. रात्रंदिवस शिवाजीरावांचा प्रवास. स्वामीजी आणि त्यांचे विचार त्यांची सोबत करीत होते. दिवसातून किती व्याख्यानं होतील याचा नेम नसायचा; पण एका ध्येयवान, निष्ठावान कार्यकर्त्याप्रमाणे त्यांची ही वक्तृत्व सेवा सुरू होती. विवेकानंद त्यावेळी मराठीतून कोणी अभ्यासले नव्हते. या परिस्थितीत प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या वक्तृत्वाने उभा महाराष्ट्र प्रभावित झाला; पण त्यातही काही संशय घेणारी मंडळी होती. त्यांना वाटू लागले की हे पाठांतर आहे. पोपटपंची आहे; पण काळ पालटला. विषय पालटले, प्रसंग बदलले, आयत्या वेळेस बोलण्याचे प्रसंग आले. प्राचार्यांच्या बोलण्यात तोच आवेश, तोच जोश, तीच प्रसन्नता आणि उत्स्फूर्तता अनुभवास आल्यानंतर सर्वांना समजले की हे वक्तृत्व वेगळंच आहे. येथे केवळ पाठांतर नाही, पांडित्य नाही, कृत्रिम असे काहीही नाही.

बळकट स्मरणशक्तीमुळे ते कोणत्याही विषयाचे उचित संदर्भ जसे देऊ शकतात तसेच मनातील विचारांना नेमके शब्दही मिळवून देतात. त्यातून त्यांच्या व्याख्यानात अस्खलितपणा आला आहे.